**E (100 Marks)**
Batch – 2020-21/2021-22

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## बी. ए. – (विशारद) सामाजिकशास्त्रे

**परीक्षा : मे / जून – २०२३**

**द्वितीय वर्ष**

**सत्र – ४**

**विषय:– मराठी साहित्य (भाग–२) (कमला, विद्रोही कविता, जरा जाऊन येतो) (BMG-401)**

| दिनांक: ०५/०६/२०२३ | गुण : १०० | वेळ : स. १०.०० ते दु. १.०० |
|---|---|---|

**सूचना :** सर्व प्रश्न सोडवा.

**प्रश्न १ दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा (कोणतेही दोन)** (४०)

१. नाटकातील ‘संघर्ष’ या घटकाचे स्वरूप सांगून ‘कमला’ नाटकातील कौटुंबिक व सामाजिक संघर्ष स्पष्ट करा.

२. दि.बा. मोकाशी यांच्या कथेतील बहुसंख्य पात्रे मध्यमवर्गीय आहेत हे विधानाचा परामर्श घ्या.

३. ‘दलित साहित्याचा उदय’ व ‘दलित साहित्याची चळवळ’ याविषयी सविस्तर विवेचन करा.

४. ‘दि.बा. मोकाशी’ यांच्या प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कथांचा आढावा घ्या.

**प्रश्न २ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** (३०)

१. ‘केशव मेश्राम’ व ‘वामन निंबाळकर’ यांच्या कवितांचा परिचय करून द्या.

२. ‘दि.बा. मोकाशी’ यांच्या कथांची भाषा साधी अनलंकृत आहे या विधानाची चर्चा करा.

३. ‘कमला’ नाटकाच्या शीर्षकाची समर्पकता विशद करा.

४. ‘कमला’ नाटकातील स्त्री व्यक्तिरेखांचे वर्णन करा.

५. दलित स्त्रियांच्या कवितेतून प्रकटणारी घुसमट उदाहरणासह स्पष्ट करा.

**प्रश्न ३ टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** (३०)

१. ‘आता’ या कवितेचा भावार्थ

२. दि.बा. मोकाशी यांच्या कथांची निवेदनपद्धती

३. विजय तेंडुलकर यांची वाङ्मयीन वाटचाल

४. ‘ब! उन्हातलं झाड’ या कवितेचा भावार्थ